॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 299574
Ext. No 143, 153

POST GRADUATE SECTION

website: srtmun.ac.in
E-mail: pg@srtmun.ac.in

जा.क्र./पी.जी./इतरशुल्कमाफीबाबत/२०२१–२२/3121

दि. १३/१०/२०२१

विषय: शैक्षणिक वर्ष २०२०–२१ च्या इतर शुल्कात सवलत देणे बाबत.

## परिपत्रक

या परिपत्रकान्वये विद्यापीठ संकुलाचे मा. संचालक, मा. संचालक विद्यापीठ उपकेंद्र लातूर, परभणी, मा. प्राचार्य न्यु मॉडेल डिग्री कॉलेज हिंगोली, मा. प्राचार्य सर्व संलग्नित महाविद्यालये यांना सविनय कळविण्यात येते की, दि. १५ सप्टेंबर २०२१ व विस्तारीत बैठक २४ व २५ सप्टेंबर २०२१ रोजी संपन्न झालेल्या मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील विषय क्रमाक ०२/७६–२०२१ च्या ठरावानुसार खालील प्रमाणे कळविण्यात येते कि,

१. ज्या विद्यार्थ्यांचे आई/वडील/पालक कोव्हीड – १९ मुळे मूत्यु पावले अशा विद्यार्थ्यांचे पदवी/पदव्युत्तर शिक्षण पुर्ण होईपर्यंतचे संपुर्ण शुल्क माफ करावे.

२. शैक्षणिक वर्ष २०२०–२१ करिता विद्यापीठ परिसर व उपपरिसरात ज्या संकुलांनी सहली करिता शुल्क आकारले होते परंतु सहली जावु शकल्या नाहीत त्या संकुलानी सहली करिता घेतलेले शुल्क विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार परत करावे अथवा पुढील वर्षात त्याचे समायोजन करावे.

३. शैक्षणिक वर्ष २०२०–२१ करिता संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ परिसर, उपपरिसरातील सर्व अभ्यासक्रमांसाठी आकारण्यात येणा–या इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क, विविध गुणदर्शन/उपक्रम शुल्क, कॉलेज मॅगझीन शुल्क, संगणक शुल्क, क्रिडा शुल्क, वैद्यकिय मदत निधी आणि युथ फेस्टीव्हल अशा ज्या बाबीवर कोणत्याही प्रकारे खर्च झाला नसेल तर ते शुल्क विद्यार्थ्यांना परत करण्यात यावे.

४. शैक्षणिक वर्ष २०२०–२१ करिता प्रयोगशाळा व ग्रंथालय शुल्कात ५० टक्के सवलत देण्यात यावी.

५. शैक्षणिक वर्ष २०२०–२१ करिता वसतिगृह शुल्क १०० टक्के माफ करण्यात यावे.

६. शैक्षणिक वर्ष २०२०—२१ करिता ज्या महाविद्यालयाने वरील प्रमाणे २,३,४ व ५ प्रमाणे शुल्क त्या त्या प्रमाणात विद्यार्थ्यांकडुन घेतले आहे ते शुल्क त्या विद्यार्थ्यांना परत करावे अथवा पुढील वर्षाच्या शुल्कातून कमी करण्यात यावे.

७. शैक्षणिक वर्ष २०२०—२१ करिता क्रिडा शुल्क, विद्यार्थी विकास शुल्क व राष्ट्रीय सेवा योजना शुल्क पुर्णपणे माफ करण्यात आले आहे. ज्या महाविद्यालयानी वरील शुल्क विद्यापीठात जमा केले आहे. त्यांचे शुल्क पुढील वर्षाच्या शुल्कामध्ये समायोजीत करण्यात येईल. तसेच ज्या महाविद्यालयांनी विद्यार्थ्याकडुन वरील शुल्क घेतलेले आहे परंतु विद्यापीठाकडे जमा केले नाही त्यांनी त्यांच्या स्तरावरून सदरील शुल्क विद्यार्थ्यास परत करावे.

**उपरोक्त प्रमाणे कार्यवाही व्हावी, हि विनंती.**

सहा. कुलसचिव
पदव्युत्तर विभाग

प्रत: माहिती तथा कार्यवाहीस्तव

१. मा. संचालक सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. संचालक विद्यापीठ उपकेंद्र लातूर, परभणी
३. मा. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
४. मा. प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली.
५. मा. संचालक, कै. उत्तमराव राठोड अदिवाशी विकास व संशोधन केंद्र, किनवट
६. मा. वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ
७. मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
८. मा. संचालक, क्रिडा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
९. मा. संचालक, विद्यार्थी विकास विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१०. मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, प्रस्तुत विद्यापीठ

प्रत माहितीस्तव सविनय सादर.

१. मा. कुलगुरू महोदयाचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. प्र. कुलगुरू महोदयाचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ